वाचा:१)शासनपत्रक्र.पी.टी.सी./१९७४/१०२५७६/दिनांक:-२०/२/१९७५
२)शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक:-जिपऔ/शिक्षण/प्रावि-३/२०१०-२०११/१०२७ दिनांक:-२५/०३/२०११ व या विभागास प्राप्त दिनांक:-२८/०३/२०११ चे पत्र.
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक:-७६८५/८८ दिनांक:-०६/०४/२०११
४) शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांचे समक्ष झालेली सुनावणी दिनांक:-१८/०४/२०११

---------------------------***********----------------------------------

जा.क्र.शिउसं/प्रावि-५/२०११-१२ /12242/40
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद विभाग औरंगाबाद.
दिनांक:- 18 APR 2011

**विषय:- सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद ही शासन मान्य शाळा सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद या संस्थेस कायम स्वरुपी हस्तांतरण करणे बाबत ...**

**आदेश:-**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी शिफारस केल्यानुसार आणि शासन निर्णय क्रमांक:-पी.टी.सी./१९७४/१०२५७६/दिनांक:-२०/२/१९७५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन व संदर्भ क्रमांक-२ च्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी हस्तांतरणाबाबत स्पष्ट केलेल्या शिफारशी प्रमाणे विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद हे सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद ही शासन मान्य शाळा सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद या संस्थेस कायम स्वरुपी हस्तांतरीत करण्यास शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून खालील अटींच्या अधिन राहून परवानगी देण्यात येते.

**१.** योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद या शाळेस शाळा संहिता आणि शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

**२.** सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद या संस्थेने सदर शाळेतील सर्व शालेय अभिलेखे, नोंदवहया, शैक्षणिक साहित्य इत्यादी सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद या संस्थेस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

**३.** सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद या शाळेतील वर्ग चालविण्यासाठी आवश्यक त्या सोयी सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद या संस्थेला उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

**४.** सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद या शाळेतील सर्व शिक्षक सहारा शिक्षण प्रसारक मंडळ,सिडको,औरंगाबाद या संस्थेकडे हस्तांतरीत झाली तरी त्याच शाळेत सेवेत राहतील.सदर कर्मचा-यांची वैयक्तिक मान्यता करुन घेण्याची जबाबदारी संस्थाचालकाची राहील त्याबाबत काही प्रश्न/प्रकरण उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी दोन्ही संस्थेची संयुक्तिक राहील.

**५.** सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद या शाळेचे हस्तांतरण करण्यापूर्वीचे तक्रारी/कोर्टकेस किंवा आर्थिक व्यवहार अथवा वसूली निघाल्यास त्याची सर्व जबाबदारी दोन्ही संस्थांवर संयुक्तिक राहील.

**कृ.मा.प.**

**६.** संस्थेत कांही वाद किंवा न्यायालयीन प्रकरणे नसल्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी हस्तांतरणाच्या वेळी खात्री करुन घ्यावी.

**७.** मा.धर्मादाय आयुक्त यांचेकडून हस्तांतरणाबाबत नाहरकत प्रमाणपत्र तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यंक राहील.

**८.** सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद या शाळेचे हस्तांतरण सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी आणि वर्गासह तसेच शैक्षणिक व भौतिक सुविधेसह करणे बंधनकारक राहील.

**९.** शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी सदर शाळेतील शिक्षकांची सन २०११-२०१२ ची वैयक्तिक मान्यता अनुशेषाप्रमाणे देण्याच्या अटीवर सदर हस्तांतरणास परवानगी देण्यात येत आहे.

**१०.** शाळेच्या हस्तांतरणाच्या संदर्भात काही तक्रारी झाल्यास, हस्तांतरणाबाबत सादर करण्यात आलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास किंवा काही न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास शाळेचे हस्तांतरणाचे आदेश कोणतीही पूर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद या शाळेचे हस्तांतरण शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी उपरोक्त बार्बीची खात्री करुन हस्तांतरणाच्या वेळी दोन्ही संस्थेचे अध्यक्ष/सचिव सदर शाळेचे अध्यापक यांचे समक्ष हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**शिक्षण उपसंचालक,**
**औरंगाबाद विभाग औरंगाबाद.**

**प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादरः-**

१. मा.प्रधान सचिव,शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-३२.

२. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४. अध्यक्ष/सचिव, सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण,एफ-1,एन-4,प्लॉट नं.69-अे,सिडको,औरंगाबाद यांना माहितीस्तव.

५. अध्यक्ष/सचिव, सहारा शिक्षण प्रसारक मंडळ, एफ-1,एन-4,प्लॉट नं.69-,सिडको,औरंगाबाद यांना माहितीस्तव.

६. मुख्याध्यापक,योगेश्वरी प्राथमिक विद्यामंदीर बजाजनगर,वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद यांना माहितीस्तव.